# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 30/04/2018 रोजी (का.क्र.प. 28) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक 30 एप्रिल 2018 रोजी (का.प.क्र .28) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 11-50 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगरसचिव श्री.डी डी सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
02. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
03. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
04. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
05. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
06. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
07. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
08. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
09. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
10. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
11. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
12. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
13. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

मा.सभापती : स्थायी समितीची आजची माझे कार्यकाळातील शेवटची सभा आहे सर्व सदस्य अधिकारी कर्मचारी यांचे मला चांगले सहकार्य मिळाले.त्याबध्दल सर्वांना धन्यवाद.

या वेळी सर्वच उपस्थित सदस्यांनी एक वर्षभरामध्ये सभागृहात झालेल्या कामकाजा बाबत,घेतलेले निर्णय या बाबत समाधान व्यक्त केले.

श्री.राजगौरव वानखेडे : काल हर्सुल सावंगी भागात कचरा टाकण्यावरून दगडफेक झाली स.सदस्यांना नागरीकांना विश्वासात घेऊन काम केले जावे.पुर्ण शहरात स्वच्छता मोहिम राबवित आहोत.सर्व अधिकारी कर्मचारी काम करीत आहे.नागरीक सहकार्य करण्यास तयार आहे.ओला सुका कचरा वेगळा देण्यास तयार आहे परंतु जमा झालेला कचरा कुठे टाकणार असा नागरीकाकडून प्रश्न येत आहे. कचरावर प्रोसेसींग करणार की नाही, नियोजन काय केले जो पर्यत नियोजन होत नाही तोपर्यत हा प्रश्न सुटणार नाही कुठे तरी रात्री चोरून कचरा टाकतो हे योग्य नाही. नागरीका बरोबर संघर्षाची वेळ येऊ नये चार जागा निश्चित केले,टेंडर प्रोसेस पुर्ण झाली का प्रॅक्टीकली काय काम होत आहे.

श्री.ऋषीकेष खैरे : समर्थनगर वार्डातील कचरा कुठे टाकला जात आहे. भोईवाडा भागात इतर वार्डाचा कचरा आणून टाकत आहे ते बंद करावे.

श्रीमती संगीता वाघुले : आरतीनगर,मिसारवाडी भागात शिवनेरी कॉलनी वार्डातील कचरा एक जवान आणून टाकतात योग्य ती कार्यवाही करावी.

श्रीमती किर्ती शिंदे : सुका कचरा जमा करून काय करणार आहे आता पुढे पावसाळा सुरू होणार आहे कशी विल्हेवाट लावणार आहे.

श्री अजीम अहेमद : झोन क्र.3 मध्ये सेंन्ट्रल नाका येथे कचरा जमा करीत आहे. त्याची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावली जात नाही.जुन्या शहरात मोठया प्रमाणात कचरा साचलेला दिसून येतो.

श्री.साहेल शेख : मा.महापौर यांनी माझे वार्डात व्हिजीट केली होती. जवळपास 99 टक्के कचरा ओला व सुका वेगळा होतो कचरा वेगवेगळा करणेसाठी डस्टबीन्स दिल्या जात नाही.

श्री.राजगौरव वानखेडे : डस्टबीन्स खरेदीच्या संचिका रिजेक्ट केलेली आहे स.सदस्यांच्या स्वेच्छानिधीतून डस्टबीन्स देण्यास हरकत नसावी.

शहर अभियंता :शासनाने स्वच्छ महाराष्ट्र अभियांन अंतर्गत डीपीआर केला त्यात डस्टबीन्स मनपाच्या खर्चातून किंवा स्वेच्छानिधीतून देण्यात येऊ नये असे आहे. जे गरीब नागरीका त्यांना डस्टबीन्स देण्यास त्याही सीएसआर फंडातून देण्यात याव्यात असे आहे.मनपाने दिल्यास ऑडीट ऑब्जेक्शन येऊ शकते.

श्री.राजगौरव वानखेडे : काही वार्डात डस्टबीन्स दिलेल्या आहे काही वार्डातच का दिल्या जात नाही.

मा.सभापती : सीएसआर फंडातून देण्याची कार्यवाही करता येईल शासनाच्या निर्णयाचा विचार करावा लागेल.

श्री.राजगौरव वानखेडे : जमा होणारा कचरयाची कुठे विल्हेवाट लावणार आहे.

अति.आयुक्त : नारेगाव येथे कचरा टाकणे बंद केल्यामूळे पर्यायी जागा नव्हती . झोन क्र. 4,5,6 येथे कचरा वर्गीकरण करणेचे चांगले काम होत आहे तेथे कम्पोस्टींग होत आहे 16 फेब्रुवारी 2018 पासून कचरा प्रश्न उपस्थित झाला शासन स्तरावर यांची दखल घेणे चालू आहे शासनाचे मा.प्रधान सचिव यांनी सुध्दा 9 मार्च 2018 रोजी या संदर्भात बैठक घेतली तसेच सह नियंत्रण समिती ही मा.विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली स्थापन झालेली आहे.त्याच दरम्यान मा.कोर्टात प्रकरण गेले त्या संदर्भात निर्णय झाले त्या बाबतीत मनपाने मा.सर्वोच्च न्यायालयात प्रकरण गेलेले आहे.मा.कोर्टाचे जे आदेश होते त्यानुसार शासनाने डीपीआर मंजूर करून दिला.त्यानुसार तीन घटकामध्ये काम करण्याचे सांगितले नारेगाव येथील जागेच्या संदर्भात मा.कोर्टात केस चालू होती तेंव्हा प्रदुषण नियंत्रण मंडळाने जो ॲक्शन प्लॅन केला होता तो मा.सुप्रीम कोर्टाने मान्य केला. त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे सांगितले होते.जेंव्हा कचराचा प्रश्न निर्माण झाला तेंव्हा रस्त्यावरील कचरामूळे दुर्गधी व आरोग्य धोक्यात येऊ नये म्हणून काही उपाययोजना केल्या. पावडर टाकले,त्यासाठी नाशिक येथील एजन्सी मिळाली त्यांनी पीट कमोप्टींग केले. प्लॅस्टीक ,कापड वेगळे होईल शहरात जवळपास 47 ठिकाणी 430 पीटचे बांधकाम उभारले आहे.ओला कचरा कम्पोस्टींग करतो आहे.काही ठिकाणी जागा नाही झोन क्र.2,3 मध्ये जागा नाही अशा ठिकाणचा कचरा वाळूज येथे बायोवेस्ट प्लॅन्ट आहे तेथे देणार आहे. सुका कचरा सीआरटीच्या मदतीने कंपनीला देतो. यासाठी लोकामध्ये जणजागृती करणे आवश्यक आहे.सह नियंत्रण समितीला काही जागेचा प्रस्ताव दिला होता आणखी दोन जागा वाढविल्या होत्या त्यात हर्सुल व झाल्टा फाटा येथील जागा आहे पडेगाव चिकलठाणा चार जागा, सध्या असलेल्या कचरावर प्रक्रिया करणेसाठी निवडल्या होत्या. सेन्ट्रल बसस्टॅण्ड जवळल्या कचरावर जशी प्रक्रिया केली तशी हर्सुल येथील कचरावर करणार आहे तेथेही खत निर्माण होईल.चाळणी लावून खत वेगळे व सुका कचरा वेगळा करणार आहे सुका कचरा कंपनीला देतो आहेत.

श्रीमती राखी देसरडा : कम्पोस्टींग पीट अर्धवट बांधले आता पावसाळा येणार आहे.

अति.आयुक्त : या आधी काही वार्डात खड्डे करून कचरा टाकला परंतु ते पावसाळयात चालत नाही त्यासाठी पीट बांधले आहे शेट केले आहे उघडयावर कोणतेही पीट ठेवले नाही.

श्री.राजगौरव वानखेडे : पीट बांधले ते कायमस्वरूपी नाही.कायमस्वरूपी मार्ग कचरावर काढावा.

अति.आयुक्त : दिर्घ काळ कच-याची समस्या सुटावी यासाठी चार जागा निवडल्या आहे 300 टन दररोजचा कचरयाचे प्रोसेसींग प्लॅन आहे. 30 टन दररोजचा बायोगॅस प्लॅन आहे.300 टन कचरा एका ठिकाणी आणणे योग्य होणार नाही म्हणून चार जागा निवडल्या आहे.एका जागेवर बायोगॅस प्लॅन टाकणार आहे.तीन जागावर 100 टन या प्रमाणे 300 टन कचरा प्रोसेसींग होणार आहे सुका कचरा कंपनीला देत आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे : कंपनीला सुका कचरा दिला परंतु काही गाडया परत येत आहे असे समजले.

अति.आयुक्त : एक गाडी परत आली 50 टन सुका कचरा दिलेला आहे.रोडचा काही कचरा जमा करतो आहे.

श्रीमती राखी देसरडा : ओला कचरा घेतात परंतु सुका कचरा लेबर घेत नाही. तो कुठे टाकायचा प्रश्न आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : लोकांचा विरोध होणार नाही अशी कार्यवाही करावी.योग्य नियोजन करावे.

श्री.ऋषीकेश खैरे : माझे वार्डातील सुका कचरा उचलला जात नाही.

अति.आयुक्त : अंबुजा कंपनीला सुका कचरा पाठवित आहोत.

श्री.राजगौरव वानखेडे : माझे वार्डात पीट केले नाही जेलच्या बाजूला मोकळी ओपनस्पेस आहे.

अति.आयुक्त : जागा असेल तर पीट करता येईल मा.जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करून कार्यवाही करता येईल.

मा.सभापती : प्रशासनाने दखल घ्यावी जेथे जागा उपलब्ध आहे तेथे पीट करावे.

श्रीमती संगिता वाघुले : वार्ड 31 मधील जवान श्री. दिपक खरे यांनी माझे वार्डात 3 ट्रक कचरा आणून टाकला त्याची बदली करावी.

मा.सभापती : संबधीतावर कार्यवाही करावी.योग्य ठिकाणी कचरा टाकण्यात यावा.

अति.आयुक्त : डीपीआर मंजूर आहे मशीनरी खरेदी बाबत टेंडर झालेले आहे 15 दिवसापर्यंत निर्णय होणे अपेक्षीत आहे.

श्री.ऋषीकेश खैरे : तापडीया नाटय मंदीर तसेच सॉक्सी टॉकीजजवळ मोठया प्रमाणात कचरा टाकला जातो.समर्थनगर भागातील इतका कचरा असू शकत नाही.कोण कचरा आणून टाकतात याची चौकशी करावी.तेथील कचरा विल्हेवाट लावावी.

मा.सभापती : एक आठवडयाच्या आत कुठे शहरात कचरा साचलेला असू नये सर्व कचरा उचलण्यात यावा.

श्रीमती मनीषा मुंढे : माझे वार्डात 7 खड्डे कचरा टाकण्यासाठी केले लेबरची संख्या कमी आहे.ओला कचरा साठी वाहन दयावे.

मा.सभापती : स.सदस्या यांचे वार्डात कचरा वाहतूकीसाठी एक वाहन देण्यात यावे.

श्री.सयद मतीन : टी बी हॉस्पीटल जवळ जागा आहे तेथे कचरा टाकतात शेड करावे.

श्रीमती संगिता वाघुले : माझे वार्डात ड्रेनेजचे लाईनचे कामे व्यवस्थीत केले नाही लोकांच्या घरामध्ये पाणी गेले.

मा.सभापती : स.सदस्यांनी जी सुचना मांडली त्याची प्रशासनाचे संबधीत अधिकारी यांनी दखल घ्यावी.

श्रीमती स्वाती नागरे : माझे वार्डात स्मशानभुमी रोडवर खडी व रेतीचे ट्रक्टर उभे असतात वाहतुकीस अडथळा निर्माण करतात कार्यवाही करावी.

श्री.सिताराम सुरे : वार्डात रस्त्याची कामे केली ड्रेनेज लाईनचे प्रॉब्लेम आहे जेटींग मशीन मिळत नाही पिसादेवी ते आरतीनगर रस्त्यावर ड्रेनेज पाणी वाहते.

मा.सभापती : नवीन जेंटीग मशीन खरेदी करीत आहोत. त्या मशीनरीचे पेमेंन्ट देणे बाकी होते म्हणून मशीनरी आलेल्या नाही. पेमेंन्ट करण्याचे आदेशीत केले आहे.

कार्य.अभियंता-श्री.कोल्हे: धनादेश दिला आहे दोन तीन दिवसात मशीनरी येतील.

श्री.सिताराम सुरे : माझे वार्डात लाईट बंद आहे एजन्सीला किती पेमेंन्ट आतापर्यंत दिले मुदत किती दिवसासाठी दिली आहे माझे वार्डात आज रोजी 50 लाईट बंद आहे.

मा.सभापती : शहर अभियंता यांनी चौकशी करावी व संबधीत ठेकेदार काम करीत नसल्यास कार्यवाही करावी.

श्री.नरगीस शेख : सोमवार या दिवशी पाणी येणार होते आले नाही.

काय.अभियंता-पापू : वार्ड 26 मध्ये चार टप्प्यात पाणी दिले जाते आता एका टप्यात पाणी देण्याचा प्रयत्न होत आहे.

या वेळी स.श्रीमती वाघुले, श्रीमती नरगीस शेख हे सदस्या डायस समोर खाली बसतात.

कार्य.अभियंता-श्री.चहल : आज पाणी दिले जाईल.

| | |
|---|---|
| श्री.राजगौरव वानखेडे | : जाहीरात फलक बाबत चर्चा झाली होती शहरात लिगल व इलिगल होर्डिग्ज किती आहे.इलिगल होर्डीग्ज किती काढल्या, यादी देणार होते. |
| मा.सभापती | : मालमत्ता अधिकारी सुट्टीवर आहे पुढील बैठकीत माहिती घेतली जाईल. |
| श्री.सयद मतीन | : विवेकानंद कॉलेज जवळील जागा लीजवर दिली त्याची लीज संपली आहे काय माहिती दयावी. |
| मा.सभापती | : दोन दिवसात माहिती घेऊन दिली जाईल. |
| श्रीमती राखी देसरडा | : तासिका शिक्षकांना 90 रू प्रमाणे वेतन देतो त्यांना कायम सेवेत करता येईल का त्यांना सुट्टीच्या दिवशी एस्ट्रा काम करावे लागते सुट्टीच्या दिवशीचा मोबदला मिळत नाही त्यांना वेळेवर मानधन पगार देण्यात यावा. |
| शिक्षणाधिकारी | :संचिका लेखा विभागाकडे मानधनाच्या तरतुदीसाठी प्रलंबीत आहे.तासीका तत्वावरील मानधन वाढविण्याचे शासनाचे कुठले निर्देश नाही. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : ही स्वायत्त संस्था आहे मनपाने निर्णय घेतल्यानंतर त्याची अमलबजावणी होणे अपेक्षीत आहे. त्या शिक्षकाकडून सर्व शिक्षा अभियानचे तसेच 10 वीचे पे्पर सुध्दा ते तपासतात.सर्व कामे करून घेतो त्याचा मोबदला का देत नाही. |
| शिक्षणाधिकारी | : या प्रकरणात मा.कोर्ट मॅटर चालू आहे मा.आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली 10 तारखेला बैठक आहे त्यात सर्व मुद्दे विचारात घेतले जातील. |
| मा.सभापती | : शिक्षकाचे वेतना बाबत प्रश्न मार्गी लावावा. |
| श्री.सयद मतीन | : उर्दुचे शिक्षकांना पुरस्कार (पारीतोषीक) देण्याचा निर्णय घेतला होता काय झाले. |
| शिक्षणाधिकारी | : जेंव्हा विदयार्थी यांचा पारीतोषीक वितरणाचा कार्यक्रम करणार होतो त्यावेळी पुरस्कार देणार असे ठरले होते परंतु तो कार्यक्रम लांबणीवर पडलेला आहे. लवकरच कार्यवाही करण्यात येईल. |
| श्रीमती संगीता वाघुले | : महिला बाल कल्याण समितीच्या माध्यमातून शिलाई मशीन वाटप झालेल्या आहेत की नाही खुलासा देणार होते. |
| मा.सभापती | : संबधीत अधिकारी उपस्थित नाही संबधीत अधिकारी यांनी स.सदस्या श्रीमती वाघुले यांना लेखी माहिती दयावी. |

**विषय क्र. 381 : (कार्य.अभि.-2)**

विषय : वार्ड क्र.107 अंतर्गत कल्याणी ड्रिम्स सोसायटी पासून ते मनपा शाळा मार्गे गोकुळधामकडे जाणारा रस्ता तसेच मनपा शाळा पासून ते श्री.वर्मा यांच्या घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्यापर्यंत 12.00 मी.रूंद विकास योजना रस्ता तयार करणे, या कामाचे ठेकेदार ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,26,10,406/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र-AMCA-272393-1 सन 2017-2018

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-2 महानगरपालिका औरंगाबाद |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.107 अंतर्गत कल्याणी ड्रिम्स सोसायटी पासून ते मनपा शाळा मार्गे गोकुळधामकडे जाणारा रस्ता तसेच मनपा शाळा पासून ते श्री.वर्मा यांच्या घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्यापर्यंत 12.00 मी.रूंद विकास योजना रस्ता तयार करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 1,26,10,406/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 1,26,10,406/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेंडर विभाग महानगरपालिका औरंगाबाद |

| | | |
|---|---|---|
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 19/01/2018 ते 12/02/2018 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 14/03/2018 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | तीन |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | ए.एस.कन्स्ट्रक्शन | 1,26,10,406.00/- | अं.प. दराने |
| 2 | अमान कन्स्ट्रक्शन | 1,35,34,748.55/- | 7.33% जास्त दराने |
| 3 | काकाजी बंडुजी पाथ्रीकर | 1,37,30,209.84/- | 8.88% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | मंजूर रेखाकंनात विकास कामे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्राच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय. |
| | तरी विषयाकिंत प्रकरणी ठेकेदार ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,26,10,406/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय क्रमांक 381 मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.107 अंतर्गत कल्याणी ड्रिम्स सोसायटी पासून ते मनपा शाळा मार्गे गोकुळधामकडे जाणारा रस्ता तसेच मनपा शाळा पासून ते श्री.वर्मा यांच्या घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्यापर्यंत 12.00 मी.रूंद विकास योजना रस्ता तयार करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,26,10,406/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 382 : (कार्य.अभि.-2)</u>**

विषय : वार्ड क्र.107 अंतर्गत नाथव्हॅली मुख्य रस्त्यापासून ते नाथपुरम मार्गे ते कल्याणी ड्रीम्स सोसायटी पर्यंत 15 मी. रूंद विकास योजना रस्ता तयार करणे, या कामाचे ठेकेदार ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,44,48,875/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र-AMCA-272393-2 सन 2017-2018

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-2 महानगरपालिका औरंगाबाद |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.107 अंतर्गत नाथव्हॅली मुख्य रस्त्यापासून ते नाथपुरम मार्गे ते कल्याणी ड्रीम्स सोसायटी पर्यंत 15 मी. रूंद विकास योजना रस्ता तयार करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 1,44,48,875/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 1,44,48,875/- |

| | | |
|---|---|---|
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेंडर विभाग महानगरपालिका औरंगाबाद |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 19/01/2018 ते 12/02/2018 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 14/03/2018 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | तीन |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | ए.एस.कन्स्ट्रक्शन | 1,44,48,875.00/- | अं.प. दराने |
| 2 | अमान कन्स्ट्रक्शन | 1,54,76,189.96/- | 7.11% जास्त दराने |
| 3 | काकाजी बंडुजी पाथ्रीकर | 1,55,55,658.77/- | 7.66% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | मंजूर रेखाकंनात विकास कामे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय. |
| | तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,44,48,875/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय क्रमांक 382 मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.107 अंतर्गत नाथव्हॅली मुख्य रस्त्यापासून ते नाथपुरम मार्गे ते कल्याणी ड्रीम्स सोसायटी पर्यंत 15 मी. रूंद विकास योजना रस्ता तयार करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,44,48,875/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 383 : (प्रभाग अधिकारी प्रभाग क्र.-09)</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,मा.अति.आयुक्त यांनी दि.23/04/2018 रोजी दिलेल्या मंजुरीनुसार, श्री.अशोक विठ्ठलराव बोर्डे,स.मजुर, प्रभाग क्रमांक-9 यांच्या मुलाच्या किडणीच्या वैद्यकीय उपचाराकरीता खर्च केलेल्या एकूण रू.10,06,748/- च्या वजा अनुज्ञेय नसलेली अनुज्ञेय र.रू.1,81,241/- वजा जाता शिल्लक र.रू.8,25,507/- च्या 90% म्हणजेच र.रू.7,42,956/- वैद्यकीय खर्चाचे परतावा म्हणुन मंजूर करण्यात येतो. प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. संबंधीताने धनादेश क्र.322510 दि.27/04/2017 र.रू.1,50,000/- अग्रीम घेतलेली असून एकुण र.रू.10,06,748/-च्या 5% रक्कम म्हणजचे रू.50,337/- मनपा फंडात जामा करून उर्वरीत र.रू.6,92,619/- मधुन अग्रीम घेतलेली र.रूपये 1,50,000/- वजा जाता रू.5,42,619/- वैद्यकीय खर्चाचा परतावा संबंधीतास अदा करण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 383 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अशोक विठ्ठलराव बोर्डे, स.मजुर, प्रभाग क्रमांक-09 यांच्या मुलाच्या किडणीच्या वैद्यकीय उपचाराकरीता खर्च केलेल्या एकूण रूपये 10,06,748/- च्या वजा अनुज्ञेय नसलेली अनुज्ञेय र.रू.1,81,241/- वजा जाता शिल्लक रक्कम 8,25,507/- च्या 90% म्हणजेच 7,42,956/- रूपये वैद्यकीय खर्चाचे परताव्यास प्रशासकीय मान्यता दिलेली असल्याने व संबंधीताने धनादेश क्रमांक 322510 दि.27/04/2017 रक्कम रूपये 1,50,000/- अग्रीम घेतलेली असून एकुण र.रू.10,06,748/- च्या 5% रक्कम म्हणजचे रूपये 50,337/- मनपा फंडात जामा करून उर्वरीत रक्कम रू.6,92,619/- मधुन अग्रीम घेतलेली रक्कम रूपये 1,50,000/- वजा जाता रू.5,42,619/- वैद्यकीय खर्चाचा परतावा संबंधीतास अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 384 :**

विषय : झोन क्र.08 अंतर्गत प्रभाग क्र.105,106 ते 111 मधील रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे, या कामाचे ठेकेदार मे.व्हि.बी.ए. इन्फ्रा यांचेकडून 5.00 टक्के अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रू.52,43,857.50/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र-AMCA-256549-1 सन 2017-2018

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-2 महानगरपालिका औरंगाबाद |
| 2. | कामाचे स्वरुप | झोन क्र.08 अंतर्गत प्रभाग क्र.105,106 ते 111 मधील रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 49,94,150.70/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 49,94,150.70/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेंडर विभाग महानगरपालिका औरंगाबाद |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 05/12/2017 ते 08/12/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 08/12/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | तीन |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नांव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त** |
|---|---|---|---|
| 1 | मे.व्हि.बी.ए. इन्फ्रा | 52,43,857.50 | 5.00% जास्त दराने |
| 2 | मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन | 54,26,644.15 | 8.66% जास्त दराने |
| 3 | मो. अहेमद सिद्दीकी | 54,31,638.30 | 8.76% जास्त दराने |

(सर्वात कमी दराची निविदा मे.व्हि.बी.ए.इन्फ्रा यांची असून त्यांचा निविदा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.93 टक्के जास्त दराने आहे. वाटाघाटी अंतर्गत कंत्राटदाराने अं.प. दरापेक्षा 5 टक्के जास्त दराने काम करण्यास संमती दिलेली आहे.)

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |

| | | |
|---|---|---|
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | (1) रस्ते देखभाल दुरूस्ती |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय. |
| | तरी विषयाकिंत प्रकरणी ठेकेदार मे.व्हि.बी.ए. इन्फ्रा यांचेकडून 5.00 टक्के अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रू.52,43,857.50/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय क्र.384 मंजूर करण्यांत येतो. तसेच चिकलठाणा येथील भाजी मंडईतील गाळे मोहम्मद अझहर मोहम्मद शहाब यांनी भाडेतत्वावर देण्याची विनंती केली आहे, त्यास मंजूरी देण्यांत येते व आज दिनांक 30/04/2018 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत स्विकृतीसह कायम करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.08 अंतर्गत प्रभाग क्र.105,106 ते 111 मधील रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.व्हि.बी.ए. इन्फ्रा यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.00 टक्के जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रू.52,43,857.50/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद